# प्रेसनोट

## मेयो हॉस्पिटलचे डॉक्टर(HOD) यांचेविरुध्द A.C.B. नागपूर पथकाने केली कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे सहायक मोटार वाहन निरीक्षक असून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धा येथे नेमणुकीस आहे. तक्रारदार हे ३ महिण्यांपासून वैद्यकीय रजेवर असल्याने त्यांना कार्यालयात रूजु झाल्यावर ३ महिन्यांचा वैद्यकीय कालावधीसाठी वैद्यकीय मंडळा समोर उपस्थित राहून वैद्यकीय मंडळाची शिफारस आणि प्रमाणपत्र आणण्याकरिता इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर येथे पाठविले होते. तक्रारदार हे वैद्यकिय मंडळापुढे उपस्थित झाले असता तेथील वैद्यकिय मंडळाचे अध्यक्ष तथा प्राध्यापक शल्यचिकित्सा विभाग प्रमुख **डॉ. नंदकिशोर कमलनारायण जैस्वाल** आणि लघुलेखक **श्री आशिष मेटेकर** यांनी तक्रारदार यांना वैद्यकिय मंडळाची शिफारस आणि प्रमाणपत्र देण्याकरिता ३००००/-रू. लाचेची मागणी करित असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर कार्यालय येथे दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही केली असता दिनांक २४/०६/२०२६ रोजी आलोसे क्र. १) डॉ. नंदकिशोर कलमनारायण जैस्वाल, वैद्यकिय मंडळ अध्यक्ष तथा प्राध्यापक विभाग प्रमुख, शल्यचिकित्सा विभाग, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर २)श्री आशिष मेटेकर, लघुलेखक, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर यांनी तक्रारदार यांना वैद्यकीय मंडळाची शिफारस आणि प्रमाणपत्र देण्याचे कामाकरिता ३०,०००/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तद्नंतर आलोसे क्र. १) डॉ. नंदकिशोर कलमनारायण जैस्वाल, वैद्यकिय मंडळ अध्यक्ष तथा प्राध्यापक विभाग प्रमुख, शल्यचिकित्सा विभाग, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर २)श्री आशिष मेटेकर, लघुलेखक, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारलेली नाही. त्यावरून आज दिनांक ३०/०६/२०२६ रोजी आलोसे क्र. १) डॉ. नंदकिशोर कलमनारायण जैस्वाल, वैद्यकिय मंडळ अध्यक्ष तथा प्राध्यापक विभाग प्रमुख, शल्यचिकित्सा विभाग, इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय नागपूर २)श्री आशिष मेटेकर, लघुलेखक, इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय नागपूर यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन तहसिल, नागपूर शहर येथे लाचेच्या मागणीबाबत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक महेश भोरटेकर, पोलीस उपअधीक्षक श्रीमती भारती गुरनुले यांचे पर्यवेक्षणात सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंन्द्र वैरागडे, सापळा पथक पोहवा आशिष वैद्य, विलीन तांबडे, करूना सहारे, अस्मिता मेश्राम, गिता चौधरी, पोशि होमेश्वर वाईलकर, प्रफुल भातुलकर, स्वाती हिंडोरिया चालक मपोशि हर्षलता भरडे यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील खालील क्रमांकावर संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०